स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीच्या

प्रबंधाचा

संशोधन आराखडा

संशोधन विषय

‘‘ औरंगाबाद जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन ’’

संशोधक

कोमल सुभाष खरात

मार्गदर्शक

डॉ. सुनंदा व्ही. भद्रशेटे

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, पदवी व पदव्युत्तर विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, ता. उदगीर, जि. लातूर

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म विद्यापीठ, नांदेड

२०२२

औरंगाबाद जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन

प्रस्तावना

शिक्षण हे समाज बदलाचे फार मोठे साधन आहे. समाजात प्रत्येकाला शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. आज समाजात दिव्यांग, दलित, मागासलेले, भटके या सर्वांना शिक्षण देवून समाजात प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे.

विसाव्या शतकाच्या अखेरीस जगामध्ये ७० कोटी लोक दिव्यांग असतील असे आढळून आले आहे. भारताच्या लोकसंख्ये इतकी ही संख्या आहे म्हणजे जगातले सर्व दिव्यांग एकत्र आले तर भारतासारखे एक राष्ट्र निर्माण होऊ शकते. असा याचा अर्थ आहे. भारतासारख्या प्रगतशील देशात दिव्यांगांचे प्रमाण १५ ते २० टक्के आहे आपल्या देशात दर पाच लोकांमागे एक व्यक्ती दिव्यांग आहे. दिव्यांगांना लांछनास्पद मानणे अजून चालूच आहे.

दिव्यांगांचे विश्व आणि सर्वसामान्यांचे विश्व हे द्वेत टिकविणे योग्य नाही. कारण दिव्यांगांना देखील सर्वसामान्यांच्या जगात वावरायचे आहे. त्यांचा शालेय जीवनाशी संबंध येऊ द्यायचा नाही हे योग्य आहे का? त्यांच्या मनाची तयारी होणे पुढील आयुष्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे. दिव्यंगत्व मानवाच्या निर्मितीपासून अस्तिवात असले तरीही दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची प्रक्रिया १९६० या दशकात सुरू झाली. शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून, त्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींना शिक्षणाद्वारे विकसित करणे गरजेचे आहे. दिव्यांग मुले जन्माला येणे हे नैसर्गिक आहे. कारण जेवढी मुले जन्माला येतात. त्यापैकी काही मुले दिव्यांग असतात. दिव्यांग मुलांच्या जन्मामुळे आई—वडील काळजीत पडतात. त्यांची जबाबदारी वाढते. तसेच काही पालकांना अशी मुले संकट वाटतात. दिव्यांग मुले आयुष्यभर निसर्गाने दिलेली शिक्षा भोगीत असतात.

या दिव्यांग बालकांचे शिक्षण सर्वसामान्यांप्रमाणे असावे की ते भिन्न असावे हा वादग्रस्त प्रश्न होता पण बऱ्याच चर्चेनंतर या क्षेत्रातील तज्ज्ञांचे व त्याचबरोबर विचारवंत, समाजाचे असे मत झाले आहे की, सक्तीचे प्राथमिक शिक्षण सर्वांना सारखे मोफत असावे. व्यक्ती—व्यक्तीच्या व्यावहारिक गरजा भिन्न असल्या तरीही हा पाया मात्र सर्वांना

समान असला पाहिजे. कारण जबाबदार नागरिक ही भूमिका सर्वांना सारख्याच तत्परतेने पार पाडता आली पाहिजे.

यातून प्रश्न निर्माण होतो की, दिव्यांग मुलांचे शिक्षण स्वतंत्रपणे व्हावे की सर्वसाधारण शाळेतून व्हावे? सर्वसाधारण शाळातील शिक्षणक्रम हा स्वाभाविकपणे सर्वसाधारण मुलांच्या दृष्टीने आखलेला असतो. त्या शाळेतील शिक्षणाची पध्दत व इतर व्यवस्था सर्वसाधारण मुलांच्या दृष्टीने ठरवलेली असते. हा अभ्यासक्रम दिव्यांगांना झेपू शकेल काय? आणि दिव्यांगांच्या ज्या अडचणी आहेत. त्यामुळे इतरांच्या व्यवस्थेत कितपत जमवून घेता येईल? सर्वसाधारण शाळेत त्यांच्यासाठी वेगळ्या सोयी करणे शक्य होणार नाही आणि मुख्य म्हणजे इतर सर्वसामान्य मुलांच्या तुलनेत आपल्यात काहीतरी उणेपणा आहे, याची सतत टोचणी लागल्यामुळे त्यांच्यात न्यूनगंडाची भावना वाढणार नाही व त्याच बरोबर इतर मुले त्यांना त्रास देण्याची भीती आहे.म्हणून सर्वसामान्य शाळेत दिव्यांग मुलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

भारतात २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येत दिव्यांगांची संख्या ही २१,९०६,७६९ इतकी असून त्यांचे लोकसंख्येतील प्रमाण २.१९ टक्के आहे. त्यात १२. ६० दशलक्ष पुरूष तर ९.३० दशलक्ष स्त्रिया आहेत. खालील तक्त्यावरून भारतातील विविध प्रकारच्या दिव्यांगांची संख्यात्मक स्थिती लक्षात येईल.

अ. क्र	दिव्यांगत्वाचे प्रकार	दिव्यांगांची संख्या	टक्केवारी
१.	दृष्टिदोष असलेले दिव्यांग	१०६३४	१.०
२.	बोलण्याची असमर्थता असलेले दिव्यांग	१६४०८६८	०.२
३.	ऐकू न येणारे किंवा बहिरे	१२६१२२	०.१
४.	हालचाल न करता येणारे दिव्यांग	६१०५४७७	०.६
५.	मानसिकदृष्ट्या दिव्यांग	२२६३८२१	०.०२

दिव्यांगाची सर्वाधिक संख्या उत्तरप्रदेशामध्ये असून ती ३.६ दशलक्ष आहे. यानंतर बिहारमध्ये १.९ दशलक्ष पश्चिम बंगालमध्ये १.८ दशलक्ष तर तामिळनाडूत १.६ दशलक्ष यात पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

महाराष्ट्र राज्यातील दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण

अ. क्र	दिव्यांगत्वाचा प्रकार	दिव्यांग व्यक्तींची संख्या	एकूण दिव्यांग पुरूषांशी प्रमाण	दिव्यांग पुरूषांचे स्त्रियांशी प्रमाण	दिव्यांग स्त्रियांची संख्या	एकूण दिव्यांग स्त्रियांशी प्रमाण	दिव्यांग स्त्रियांचे पुरूषांशी प्रमाण	एकूण दिव्यांग व्यक्ती	एकूण दिव्यांग व्यक्तींशी प्रमाण
१.	अंध	३२०४६६	३४.३२	५५.१६	२६०४६४	४०.९७	४४.८४	५८०९३०	३७.०१

२.	मुके	६३८०२	६.८३	५६.४४	४९२४१	७.५७	४३.५६	११३०४३	७.२०
३	बहिरे	५१७८९	५.५५	५६.०५	४०६०१	६.३९	४३.९५	९५३९०	५.८९
४	अस्थिव्यंग	३७४६७१	४०.१२	६५.७४	१९५२७४	३०.७२	३४.२६	५६९९४५	३६.३१
५	मतिमंद	१२३१३९	१३.१८	५७.७४	९०१३५	१४.१८	४२.२६	२१३२७४	१३.५९
	एकूण	९३३८६७	१००		६३५७१५	१००		१५६९५८२	१००

(स्त्रोतः महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा, २०११ अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे)

महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण कृती आराखडा २०११ नुसार महाराष्ट्रामध्ये एकूण दिव्यांग व्यक्तींची संख्या १५ लाख ६९ हजार ५८२ इतकी आहे. सर्वात जास्त दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण अंध व्यक्तींचे आहे. एकूण दिव्यांग व्यक्तींमध्ये अंध व्यक्तीचे प्रमाण ३७ टक्के आहे. अंध व्यक्तींपैकी ५५ टक्के पुरूष तर ४५ टक्के स्त्रियांचे प्रमाण आहे. अंध व्यक्तींखालोखाल अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण असून ते एकूण दिव्यांग व्यक्तींपैकी ३६ टक्के आहे. दिव्यांग व्यक्तींमध्ये बहिऱ्या व्यक्तींचे प्रमाण कमी असून ते जवळपास ६ टक्के आहे.

अलीकडे दिव्यांगांच्या पुनर्वसनाबाबत बरीच जनजागृती होते आहे असे वाटत असले तरी ती शहरांपुरतीच मर्यादित आहे. दिव्यांगांसाठीच्या उपचारात्मक, पुनर्वसनात्मक व प्रतिबंधात्मक सेवांचा फायदा ग्रामीण भागाला फारसा झालेला नाही. वास्तविक सुमारे ९५ टक्के दिव्यांग खेड्यापाड्यातून विखूरलेले आहेत. पण त्यांच्या वाट्याला मात्र उपेक्षा व असहाय्यता आलेली आहे.

वास्तविक पाहता शारीरिकदृष्ट्या दिव्यांग मूल सर्वसाधारण मुलांच्या शाळेत जाऊ शकते. कारण शारीरिक दिव्यंगत्व असलेल्या मुलांची बुध्दिमत्ता काही अपवाद वगळता व्यवस्थित असते. त्यामुळे आपल्याला कित्येकदा अशी मुले म्हणजे ज्यांच्या हातापायात काही दोष आहे अशी मुले, सर्वसाधारण मुलांच्या शाळेत जाताना दिसतात पण यातही काही समस्या असतात. त्यात त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक समस्या खूप मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात.

अगदी लहानपणी ज्या मुलाला पोलिओ होऊन कॅलिपर्स लावून चालायला लागते. त्याला साधारण शाळेत जाईपर्यंत चांगलाच आत्मविश्वास आलेला असतो. पण एखाद्या मुलाचे दिव्यंगत्व जास्त तीव्र स्वरूपाचे असते व त्याला पुनर्वसनाची सर्व साधने लावून चालायला लागते. उदा. दोन्ही पायात कमरेपर्यंत कॅलिपर्स व कुबड्या घेऊन चालणे किंवा कधी—कधी तेही शक्य नसल्यास व्हिलचेअर वरून वर्गात जाणे वगैर. अशा वेळी मुलाला पुनर्वसनाची साधने वापरणे याचा सराव होऊन त्याच्यात आत्मविश्वास निर्माण होण्याअधीच जर त्याला सर्वसाधारण मुलांच्या शाळेत घातले तर त्याचा त्या मुलाला

खूपच त्रास होण्याची शक्यता असते. हा त्रास कशामुळे होऊ शकतो? पुनर्वसनाची साधने वापरण्याचा पूर्ण सराव नसलेला मुलगा आधीच बावरलेल्या मन:स्थितीत असतो. त्यातून अशा शरीराच्या व मनाच्या नाजूक परिस्थितीत त्याला सर्वसाधारण मुलांमध्ये सोडले तर तो अधिकच गोंधळतो. एक तर सर्वसामान्य मुले लहान वयात अवखळ व खोडकर असतात. अशावेळी एखादा दिव्यांग आपल्या शाळेत आलेला आहे. त्याला समंजसपणे आपल्यात सामावून घेणे व मदत करणे इतका शहाणपणा त्या वयात त्यांना नसतो. कुतुहल व खोडकर स्वभाव यामुळे त्या मुलाला सतावणे, ढकलणे इ. गोष्टी जरी चेष्टेपोटी किंवा खोड्यापोटी झाल्या तरी दिव्यांग मुलाच्या मनावर त्याचा परिणाम खोलवर होतो. सर्वसामान्यांच्या शाळेत त्याला लागणाऱ्या वेगवेगळया प्रकारच्या सुविधा असतातच असे नाही. उदा. काही दिव्यांग मुलांना आपल्या पध्दतीच्या स्वच्छतागृहात बसता येत नाही. त्यांना पाश्चात्य पध्दतीचे स्वच्छतागृहे लागते. काही दिव्यांगांना जिने चढता येत नाहीत. त्यामुळे त्यांना वर्ग वरच्या मजल्यावर असला तर लिफ्ट लागते किंवा वर्गच खाली असावा लागतो. काही मुलांना हाताने लिहिता येत नाही मग त्यांना पायाने लिहायला शिकवतात व वर्गातही त्यांची खास सोय करावी लागते.

काही दिव्यांग मुलांना पहिली काही वर्षे सतत फिजिओथेरपीची आवश्यकता असते. ती सोय सर्वसामान्य विद्यालयात होऊ शकत नाही. अशावेळी त्यांना त्यांच्यासाठी असलेल्या स्वतंत्र शाळेत पहिली काही वर्षे जाऊ दिली पाहिजे. जेव्हा त्यांना सर्व गोष्टींचा सराव होतो त्या वेळेस त्यांना सर्वसामान्यांच्या शाळेत जाऊ दिले पाहिजे. कधी कधी काहींचे दिव्यंगत्व एवढे तीव्र स्वरूपाचे असते की त्यांना शेवटपर्यंत खास शाळेतच शिकावे लागते.

संशोधनाचे महत्व :

कोणतेही सामाजिक संशोधन हे सामाजिक घटनांचे अध्ययन आहे. ज्यामुळे समाजाला आपल्या हक्क व अधिकारांची जाणीव होते. म्हणून सामाजिक संशोधनाचे महत्व नाकारता येत नाही.

पीएच.डी शोध प्रबंधासाठी विषय निवडण्याची वेळ आली तेव्हा ''औरंगाबाद जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' हा संशोधन विषय निश्चित केला आहे. विषयाचे महत्व खालील प्रमाणे आहे.

१) संशोधन विषय निश्चितीचे कारण शिक्षण हे समाज बदलाचे फार मोठे साधन आहे समाजात प्रत्येकाला शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. समाजातील सर्वच घटकांचा विकास होण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे. समाजातील प्रत्येक शारीरिक दिव्यांग

विद्यार्थ्यांना समानतेची, न्यायाची व बंधुतेची वागणूक मिळण्याची गरज आहे. म्हणून दिव्यांग विद्यार्थ्यांना सुध्दा शिक्षण घेण्याचा हक्क मिळाला पाहिजे.

२) शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत अनेक समस्या आहेत. त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शासनाने निर्धारीत केलेल्या विविध सुविधांचा व सवलतींचा मुलांना फायदा होतो का? हे जाणून घेणे महत्वाचे आहे. शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे. दिव्यांग मुलांना वाटणाऱ्या न्यूनगंडाचा अभ्यास करणे ही महत्वाचे आहे आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांवर उपाय सुचविणे ही अगत्याचे आहे. त्या अनुषंगाने संशोधन विषय निवडण्यात आला आहे. तसेच अशा प्रकारचा सखोल अभ्यास यापूर्वी झाला नसल्याने ''औरंगाबाद जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' या विषयीचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन हाती घेण्यात आले.

प्रस्तुत संशोधनाची उपयुक्तता

१) दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शासकीय योजना व निधी, सवलती या बाबींच्या माहितीमुळे नविन आखणी करण्यासाठी पुरेपुर लाभ होऊ शकेल.

२) दिव्यांग विद्यार्थ्यांना शासकीय निधी व योजनांची पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांचा सखोल अभ्यास करून उपाय सुचविण्याच्या दृष्टिने उपयुक्त.

३) दिव्यांग विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून मानसिक समाधान प्राप्त करून देण्यास्तव उपयुक्त.

सैध्दांतिक दृष्टिकोन

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. परंतु समाजामध्ये उच्च—निम्न, वरिष्ठ—कनिष्ठ, सबल—दुर्बल असे भेद दिसून येतात. समाजामध्ये शारीरिक दुर्बल घटकांना दुय्यम वागणूक दिली जाते त्यामुळे समाजातील ही विषमता कमी करण्यासाठी तयार केलेले कायदे कितीही मजबूत असले तरी जोपर्यंत व्यक्ती आपल्या अधिकारांविषयी आणि त्यांच्या उल्लंघनाविषयी जाणून घेत नाही तोपर्यंत सर्व व्यर्थ आहे. आपण आपल्या अधिकारांच्या झालेल्या उल्लंघनाविरूध्द लढू शकतो. दिव्यांग व्यक्ती संदर्भातही हीच गोष्ट

आहे. ते शिक्षणापासून वंचित आहे त्यांच्याजवळ रोजगार नाही. ते शारीरिक दृष्ट्या इतरांपेक्षा दुर्बल आहे. जवळ–जवळ एक दशकापूर्वी त्यांच्या अनेक जणांना आपल्या अधिकारांविषयी माहिती नव्हती यामुळे ते दुसऱ्यांच्या हातून शोषणाचे बळी ठरत होते. ज्या प्रमाणे समाजामध्ये जातीव्यवस्था आहे. ज्यामुळे उच्च व कनिष्ठ जातीवर नियंत्रण प्रस्थापित होते. त्यामुळे विषमता निर्माण होते. त्यामुळे ते विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकत नाही. त्याच प्रमाणे दिव्यांगही इतरांपेक्षा वेगळे आहे, असे समजून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास अनेक अडचणी येतात.

प्रस्तुत संशोधनाकरिता निवडण्यात आलेल्या शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन करण्यास्तव रॉबर्ट मर्टन यांनी मांडलेला सामाजिक सापेक्ष वंचितता या दृष्टिकोनाचा अवलंब करण्यात येणार आहे. रॉबर्ट मर्टन यांनी सामाजिक विचलनासंबंधी विचार मांडत असतांना ते सामाजिक सापेक्ष वंचितता या संकल्पनेशी संबंधित असल्याचे दिसून येते. कारण सामाजिक विचलनाची प्रक्रिया ही समाजातील नियमने अधिक कठोर असताना काही लोक उपलब्ध साधनांचा उपभोग घेतात. परंतु गरिब वा दुर्बल व्यक्तींना आपल्या जीवनावश्यक गरजांपासून वंचित राहावे लागते. त्यामुळे समाजात विषमता निर्माण होते.

संशोधनाचा उद्देश

कुठल्याही सामाजिक संशोधनात अभ्यासाची उद्दिष्टे ही ठाम व सुस्पष्ट असावी लागतात. अशा उद्दिष्टांचे स्वरूप निश्चित करावे लागते. ही उद्दिष्टे विषयानुसार व त्याच्या व्याप्तीनुसार बदलत असतात. संकल्पनांचे स्पष्टीकरण आणि सुयोग्य उद्दिष्टे यामुळे अभ्यास विषय चांगल्या प्रकारे हाताळता येतो. समूह व गट यांच्या पुढील समस्यांच्या निराकरणासाठी विधायक कार्यक्रमांची आखणी करणे हे संशोधन कार्याचे प्रधान उद्दिष्ट म्हणता येईल. या संशोधन प्रकल्पासाठी उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक समस्या जाणून घेणे.

२) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

३) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंडाचा अभ्यास करणे.

५) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शासनाने निर्धारित केलेल्या योजना व सुविधांचा शोध घेणे.

संशोधनाची गृहितके

सामाजिक संशोधनात गृहितकांना विशेष महत्व असते. कारण अशा गृहितकांमुळे पुढील संशोधनाचा मार्ग सुलभ होऊ शकतो.

१) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शैक्षणिक व भौतिक सुविधा अपुऱ्या असल्याचे दिसून येते.

२) दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो.

३) दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड असतो

४) दिव्यांग विद्यार्थ्यांना शासनाने निर्धारित केलेल्या सुविधांचा लाभ अल्प प्रमाणात मिळतो.

वरील सर्व गृहितकृत्ये पडताळण्यासाठी व अभ्यासात शास्त्रीय पध्दतीचा उपयोग करून घेण्यासाठी सामाजिक संशोधनाची आखणी केली आहे. या अभ्यासात ''औरंगाबाद जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन'' या विषयाचा अभ्यास करतांना उपरोक्त गृहितकृत्ये लक्षात घेतलेली आहेत.

संशोधन प्रक्रिया

वरील उद्दिष्टे व गृहितके पडताळून पाहण्यासाठी खालील संशोधन प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल.

संशोधन आराखडा :

शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यास्तव विश्लेषण व त्यावर उपाय योजनेच्या अनुषंगाने शास्त्रीय अमंलबजावणी करण्यासाठी या संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरून या अभ्यासाला शास्त्रीय बैठक प्राप्त करून दिली जाणार आहे. वर्णनात्मक संशोधनाचा उद्देश संशोधन विषयाच्या बाबतीत यथार्थ आणि पूर्ण माहिती प्राप्त करून घेणे आवश्यक असते. वास्तविक आणि विश्वसनीय तथ्ये हाच वैज्ञानिक वर्णनाचा आधार आहे. तथ्याधिष्ठित माहितीच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण म्हणजे वर्णनात्मक संशोधन

आराखडा होय. वर्णनात्मक आराखडयात वैज्ञानिक तंत्राचा उपयोग करून तथ्ये संकलित केली जातात.

शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचा अभ्यास करतांना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रवाहाचा विचार करणे आवश्यक आहे. दिव्यांगाचा समाज व्यवस्थेतील विविध घटकांवर परिणाम होतो. हे शोधणे आवश्यक आहे. गुतांगुतीच्या सामाजिक प्रश्नाच्या शास्त्रीय वर्णनासाठी हा आराखडा अत्यंत समर्पक व सुयोग्य ठरू शकेल. **वर्णनात्मक संशोधन आराखडा या संशोधनात कशा पध्दतीने उपयोगात आणला जाईल याचे स्पष्टीकरण खालील प्रमाणे आहे.**

१) संशोधनाला तात्विक बैठक लाभावी व संशोधनाला योग्य दिशा मिळावी तसेच संशोधन नविन दृष्टिकोणातून व्हावे यासाठी प्रस्तूत संशोधनात समस्येशी संबंधित साहित्याच्या परिक्षणाबरोबरच उपलब्ध सामुग्रीचे समिक्षण व मुल्यमापन करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

२) शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचे सोयीस्कर नमूना निवड पध्दतीने तथ्य संकलित केली जातील.

३) ज्या बाबींमूळे अंतर्दृष्टिस चालना मिळेल अशा बाबींचे विश्लेषण करणे ज्यामुळे संशोधनकर्त्यास अध्ययन विषयासंबंधी उपयुक्त कल्पना सुचू शकतील. त्या सर्वांचा सदरील अभ्यासात विचार केला जाणार आहे. व त्या आधारे वर्णनात्मक संशोधन आराखडा व्यवहार्य स्वरूपात अमंलात आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या संशोधनामध्ये शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचे स्वरूप, शिक्षण घेत असतांना येणाऱ्या अडचणी दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शासनाच्या सवलती व त्यांच्यावर होणाऱ्या सामाजिक परिणामाबरोबर व त्यांना येणाऱ्या समस्येची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने समाजशास्त्रीय अध्ययन केले जाणार आहे.

नमुना निवड पध्दती :

औरंगाबाद जिल्हा या अध्ययनाचे समग्र किंवा विश्व आहे. संपूर्ण समग्राचे अध्ययन करण्याऐवजी समग्रातील काही नमुना एककांची निवड सोयीस्कर नमुना निवड पध्दतीद्वारे करून त्यांच्या अध्ययनावरून तथ्ये संकलित केली जातील.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, स्थितीचे अध्ययन करण्यानुसार सोयीस्कर नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला जाईल.

दिव्यांगाच्या २१ प्रकारानुसार औरंगाबाद जिल्ह्यात एकूण दिव्यागांची संख्या ८९५५ इतकी आहे. सदरील संशोधनात शारीरिक दिव्यांगाचाच अभ्यास करण्यात येत असल्याने दिव्यांगाच्या २१ प्रकारापैकी शारीरिक दिव्यांगाचेच प्रकार संशोधनासाठी निवडले आहे मानसिक दिव्यांग वगळण्यात आले आहे. म्हणून औरंगाबाद जिल्ह्यात शारीरिक दिव्यांगाची एकूण संख्या ४०० इतकी आहे.

तारो यमने (Taro Yamane) यांच्या नमुना सूत्रानुसार —

Yamane, Taro. 1967. Statistics: An Introductory Analysis, 2ns Edition, New York: Harper and Row.

$$\frac{N}{1 + n(e)^2} = \frac{400}{1 + 400(0.05)^2} = \frac{400}{1 + 400 * 0.0025} = \frac{400}{1 + 1}$$

$$\frac{400}{2} = \mathbf{200}$$ SAMPLE SIZE.

1) जसे 400 ला 200

तसे 46 ला ?

$$\frac{46 * 200}{400} = \mathbf{23}$$

2) $$\frac{45 * 200}{400} = \mathbf{22}$$

5) $$\frac{61 * 200}{400} = \mathbf{31}$$

6) $$\frac{40 * 200}{400} = \mathbf{20}$$

7) 17 * 200

400

3) 45 * 200

____________ = **22**

400

4) 30 * 200

____________ = **15**

400

____________ = **9**

400

8) 35 * 200

____________ = **17**

400

9) 81 * 200

______________ = **41**

400

औरंगाबाद जिल्हा एकूण शारीरिक दिव्यांग ४००			
अ.क्र	**तालुके**	**एकूण दिव्यांग**	**नमुना**
१	औरंगाबाद	४६	२३
२	गंगापुर	४५	२२
३	कन्नड	४५	२२
४	खुल्ताबाद	३०	१५
५	पैठण	६१	३१
६	सिल्लोड	४०	२०
७	सोयगांव	१७	९
८	वैजापुर	३५	१७
९	फुलंब्री	८१	४१
	एकूण	**४००**	**२००**

(UDISE Plus 2019-20 CWSM Enrollment for Checking)

प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद जिल्हा हे अभ्यास विषयाचे क्षेत्र असून औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण ९ तालुक्यातील एकूण २०० उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूची द्वारे माहिती संकलित केली जाईल.

नमुना निवडीद्वारे जे निष्कर्ष प्रमाणित ठरतील ते संपूर्ण समग्राच्या निष्कर्षांहून फारसे वेगळे नसतील अशी पूर्व मान्यता लक्षात घेतलेली आहे. सदर संशोधनासाठी

औरंगाबाद जिल्ह्याची निवड केलेली आहे. एका जिल्ह्यातून तारो यमने नमुना सूत्रानुसार २०० एककांकडून मुलाखत अनुसूची तंत्राचा अवलंब करून माहितीचे संकलन करून विश्लेषण करण्यात येईल.

संपूर्ण समग्राचे अध्ययन

अध्ययन क्षेत्र कोणते आहे व ते कशा पध्दतीने निवडले आहे यावर संशोधनाची दिशा अवलंबून असते. योग्य अध्ययन क्षेत्र निवडीतूनच अभ्यास विषय अधिक स्पष्ट होऊ शकतो. सदरील संशोधनाचे कार्यक्षेत्र, कालावधी इत्यादीचा विचार करता संशोधनासाठी संपूर्ण समग्राचा अभ्यास निश्चित केला आहे. या अभ्यासामध्ये –

१) २०२२ ते २०२५ या कालावधीत औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या ५ वी ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

२) औरंगाबाद जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभाग यांच्या सांख्यिकी आकडेवारीनुसार जिल्हा परिषदेच्या शाळांमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची (वैयक्तिक, कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, विविध योजना सवलती) अशा विविध घटकांची माहिती संकलित करण्यासाठी म्हणून निवड केली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण २०० दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती संकलित केली जाईल.

तथ्य संकलन पध्दती:

प्रस्तुत संशोधनात संशोधन कार्य पूर्ण करण्याकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा अवलंब करून माहिती संकलित केली जाईल. त्यासाठी मुलाखत अनुसूची तंत्राचा अवलंब केला जाईल. ज्या उत्तरदात्याकडून विषयाच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने माहिती मिळवायची आहे, त्या उत्तरदात्याकडून तथ्य संकलन करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत

प्राथमिक तथ्य प्राप्त करण्यासाठी संशोधक आपल्या संशोधन क्षेत्रात जाऊन संशोधन समस्येशी संबंधित असणाऱ्या व्यक्तीशी संपर्क साधून प्रश्न विचारून माहिती संकलित करेल ‘‘ औरंगाबाद जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन ’’ या विषयाच्या अभ्यासासाठी मुलाखत अनुसूची पध्दतीद्वारे प्राथमिक माहिती संकलित करून शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक समस्या अडचणी त्यांची आर्थिक परिस्थिती याचे विश्लेषण केले जाईल.

मुलाखत अनुसूची

मुलाखत अनुसूचीत विचारल्या गेलेल्या प्रश्नांची साधारणत: चार भागात विभागणी केली जाईल. वैयक्तीक माहिती आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक समस्याविषयक प्रश्न प्रमुख उद्दिष्टांच्या व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अडी—अडचणीच्या अनुषंगाने असणारे प्रश्न विचारण्यात येईल. इतकेच नव्हे तर बहूतांश प्रश्नांना अभ्यासकाच्या दृष्टिने बहूपर्यायी संभाव्य उत्तरे दिली जातील. परंतु काही प्रश्नाची उत्तरे अस्पष्ट असतात किंवा उत्तरदात्याकडून याबाबत वरील पर्यायापेक्षा वेगळा अभिप्राय द्यावयाचा असल्यास अशा प्रश्नाखाली उत्तरदात्यास इतर हा पर्याय दिला जाईल. त्यामुळे उत्तरदात्याला स्वत:च्या शब्दात प्रतिक्रिया देण्याचे पूर्ण स्वतंत्र्य दिले जाईल.

निवडलेल्या उत्तरदात्याच्या मुलाखत अनुसूची द्वारे मुलाखती घेऊन विषयासंबंधीची विविध माहिती संकलित नोंदी स्वरूपात करून प्राथमिक पध्दतीत प्रामुख्याने भर देण्यात येईल.

दुय्यम स्त्रोत

अभ्यासिकेने संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी प्राथमिक स्त्रोताला पुष्टी देण्यासाठी दुय्यम स्त्रोतात शासकीय संकेतस्थळे, शासकीय दस्ताऐवज, अहवाल आणि संदर्भग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, लघूशोध प्रबंध, त्रैमासिके, पुस्तके, विकलांग अधिनियम २०१६, दिव्यांगांविषयी प्रकाशित व अप्रकाशित साहित्य तसेच विविध सामग्रीचा उपयोग माहिती संकलनाकरिता करण्यात येईल.

तथ्य विश्लेषण:

विश्लेषण आणि अन्वयार्थ या संशोधन प्रक्रियेतील महत्वाच्या पायऱ्या आहेत. संकलित तथ्यांचा संक्षिप्तीकरणाद्वारे संशोधन समस्येला उत्तर शोधणे हे विश्लेषणाचे प्रमुख उद्दिष्ट असते. सामाजिक संशोधनात संकलित केलेल्या तथ्यांचे जोपर्यंत विश्लेषण व अन्वयार्थ करीत नाही तोपर्यंत ती तथ्य अर्थहीन असतात. म्हणून संकलित तथ्यांचे विश्लेषण व अन्वयार्थ कशा प्रकारे केले जाते हेही तितकेच महत्वाचे आहे. कारण त्याशिवाय संकलित तथ्यांचे महत्व लक्षात येणार नाही आणि गृहितकांची चाचणी होणे शक्य नाही.

संशोधक संशोधनासाठी जी तथ्य संकलित करणार आहे त्याचे योग्य विश्लेषण करणे आवश्यक आहे. म्हणून उपलब्ध माहितीच्या आधारे निश्चित स्थितीचे विश्लेषण

एस. पी. एस. एस (SPSS) या सांख्यिकीय तंत्राचा वापर करून या संगणकीय प्रणालीच्या माध्यमाने संकलित माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले जातील.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

संशोधनाची व्याप्ती मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील औरंगाबाद, सोयगाव, सिल्लोड, कन्नड, खुलताबाद, वैजापुर, फुलंब्री, गंगापुर, पैठण तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

संशोधन साहित्याचा आढावा

शारीरिक व मानसिक दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाची गरज आहे. कारण समाजात अशा मुलांची अव्हेलना होते. पालकांनी व समाजातील इतर घटकांनी आणि शासनाने एकत्र येऊन या मुलांच्या पुनर्वसनासाठी शक्यतो जास्त सुविधा पुरविणे, कायदे करणे आणि या मुलांना सामान्य माणसांप्रमाणे जगण्याची संधी देणे अत्यावश्यक आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. शासन आणि समाजातील घटक या मुलांकडे पाहिजे तितके लक्ष देताना दिसत नाही. समाजात या मुलांची सतत अव्हेलना होताना दिसून येते. त्यांना शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडचणी, निवासी शाळेत येणाऱ्या अडचणी, शाळेत असलेल्या सुविधांचे अवलोकन करण्याचा प्रयत्न आणि त्यांचे प्रश्न सोडविणे आवश्यक बनले आहे. या प्रश्नांची तिव्रता, कारणमीमांसा आणि उपाययोजना यावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. म्हणून संशोधकाने या ठिकाणी जे काही पूर्व संशोधन झाले आहे. याचा संक्षिप्त आढावा घेतलेला आहे.

या अध्ययनांतर्गत संशोधन समस्याशी संबंधित साहित्याचे महत्व एक महत्वाचा भाग आहे. या अध्ययनात अलीकडील संशोधन अध्ययनाचे सारांश व सैध्दांतिक लेखन तसेच महत्वपूर्ण रूपातून क्षेत्रकार्यातील महत्वाच्या लेखनांचा समावेश केलेला आहे.

१) जयती अधिकारी

यांनी अंध मुलांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या **‘ दृष्टी अपंगत्व मुलांमधून अपंग मुलांचे प्राबल्य अभ्यासणे ’** या अध्ययनासाठी त्यांनी ९ ते १२ या वयोगटातील मुलांचा अभ्यास केला आहे. त्यांनी दृष्टी अपंगत्वाच्या समस्येचे स्वरूप अभ्यासले आणि त्याचबरोबऱ भाषा, स्मृती, संवेदना, सामाजिक आणि शरीरयंत्र रचना यातील त्रुटी अभ्यासली आणि दृष्टी अपंग शोधण्यासाठी साहित्य तयार केले.

२) प्रभातसिंह राघोबा

'सामान्य विद्यार्थी व शारीरिक अपंग विद्यार्थी यांचे समायोजन, आक्रमकता, संपादणूकीबाबतची प्रेरणा व स्व—संकल्पनेच्या संदर्भातील तुलनात्मक अभ्यास' या संशोधनात सामान्य विद्यार्थी व शारीरिक अपंग विद्यार्थी यांचे समायोजन, आक्रमकता, संपादणूक प्रेरणा व स्व—संकल्पना या संदर्भात तौलनिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना सदर संशोधनात असे निष्कर्ष आढळून आले की, इयत्ता ८ वी, ९ वी तील सामान्य विद्यार्थ्यांचे समायोजन इयत्ता ८ वी, ९ वी तील शारीरिक अपंग विद्यार्थ्यांच्या तुलनेत चांगले आढळले. शारीरिक अपंग विद्यार्थ्यांपैकी हिंदू व मुस्लिम विद्यार्थ्यांचे समायोजन जैन विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक चांगल्या प्रकारे आढळले. शारीरिक अपंग विद्यार्थी आणि सामान्य विद्यार्थी यांच्यात आक्रमकता व संपादणाची प्रेरणा यांच्यात फारसा फरक आढळला नाही. सामान्य मुले शारीरिक अपंग मुलांपेक्षा स्व—संकल्पनेबाबत अधिक सरस आढळून आली. तसेच सामान्य मुले या शारीरिक अपंग मुली पेक्षा स्व—संकल्पनेबाबत अधिक सरस आढळून आल्या.

३) शशी मेहता

यांच्या **'महाराष्ट्रातील संस्थातंर्गत अंधांचा अभ्यास'** या त्यांनी केलेल्या अध्ययनात त्यांना असे निष्कर्ष दिसून आले की, अंधांच्या संख्याद्वारे पुरविल्या जाणाऱ्या शिक्षण व पुनर्वसनासाठीच्या सुविधा या प्रामुख्याने उघडउघड कमी पडणाऱ्या होत्या. (अंधांची आकारित संख्या ही ७०,७४० आहे तर त्या महाराष्ट्रातील २४ संस्थांमधील अंधांची, संख्या १,५०१ म्हणजे फक्त २२% होती.) ५४.९०% अंधांचे प्रमाण शहरी भागातील होते जेथे सुविधाविषयी जागरूकतेचे प्रमाण अधिक होते. १०३० पुरूष तर फक्त २३७ स्त्रिया होत्या त्याचे कारण बहुधा स्त्रियांचे/मुलीचे पालक त्यांना घरापासून दूर पाठविण्यास नाखुश असावेत. ८४% अंध हे जीवनाच्या सर्वात महत्वाच्या वयाच्या म्हणजेच ७ — २५ वयोगटातील होते. ११.३०% (१४४) मुलांमध्ये बालपणातील कुपोषणामुळे अंधत्व आढळले ५२% अंधत्वाचे निराकरण करता येऊ शकले असते. त्यासाठी शाळेतील आरोग्य काळजी व डोळ्यांच्या निगांच्या सुविधांच्या विकासावर जोर देण्यात आला. अंधत्वाच्या बाबीमध्ये अपघाती अंधत्वाचे प्रमाण २.५०% पेक्षा कमी होते

४) उप्रेती, व्ही.

'सामान्य मुले आणि अस्थिव्यंग मुले यांच्या स्व—संकल्पना, गरजा आणि बुध्दिमत्ता याबाबतचा तौलनिक अभ्यास' सदर संशोधन हे सामान्य मुले आणि अस्थिव्यंग मुले यांच्या स्व—संकल्पना, गरजा आणि बुध्दिमत्ता यांच्या फरकावर केंद्रित झाले आहे. या संशोधनात त्यांनी असे निष्कर्ष मांडले की, स्व—संकल्पनेबाबत सामान्य विद्यार्थी अपंग विद्यार्थ्यांपेक्षा आधिक सरस होते. मुलभूत गरजांच्या बाबतीत अपंगांच्या गुणांचे मध्यमान हे सामान्य विद्यार्थ्यांच्या गुणांच्या मध्यमानापेक्षा अधिक आढळून आले. या उलट बदलत्या गरजांच्या संदर्भात सामान्य विद्यार्थ्यांच्या गुणांचे मध्यमान अपंगांच्या मध्यमानापेक्षा लक्षात घेण्याजोगे सरस होते. सामान्य विद्यार्थी हे बुध्दिमत्तेच्या बाबतीत अपंग विद्यार्थ्यांपेक्षा अधिक बुध्दिमत्तेचे आढळून आले. मुलां—मुलींच्या स्व—संकल्पनेबाबत कोणत्याही प्रकारचा फरक आढळून आला नाही. अपंग मुलांचे संपादणूकीत आणि गरजांबाबत गुणांचे मध्यमान उच्च आढळून आले. अपंग मुलांचे भिन्न लिंगी गरजांबाबत गुणांचे मध्यमान अपंग मुलीपेक्षा अधिक आढळून आले. अपंग मुले आणि मुली यांच्या बुध्दिमत्तेबाबत कोणताही बदल आढळून आला नाही. १६ ते १८ वयोगटातील अपंग मुले १३ ते १५ वयोगटातील अपंग मुलांपेक्षा जास्त बुध्दिमान आहे. असे निष्कर्ष त्यांनी आपल्या संशोधनात मांडले आहे.

५) राजेंद्र टी व्यास

यांनी अंधांची पार्श्वभूमी आणि विकसित होणारे नैतिक स्थान यांची तपासणी केली आहे. त्यांनी आपल्या **मुंबई शहरातील अंध व्यक्तींची सामाजिक पार्श्वभूमी व त्यांची वर्तमान स्थिती** या त्यांनी केलेल्या अध्ययनात त्यांनी असे निष्कर्ष मांडले की, अंधांची सामाजिक स्थिती ही असमाधानकारक होती. त्याकरिता काही शिफारसींची तरतूद होती. त्या तरतूदींमध्ये प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक यंत्रानी सज्ज नेत्र चिकित्सालयांचा उदय, नियोजित व सुसज्ज शिक्षण सुविधा दुय्यम स्तरापर्यंत पुरविणे, ब्रेल लिपीची तरतूद, बोलकी पुस्तके, टंकलेखनाची तरतूद अशा काही शिफारशींचा समावेश होता. खानेसुमारीत दर्शविल्याप्रमाणे ४० ते ६०% नमुन्यांमध्ये (अंधांमध्ये) अंधत्व हे प्रतिबंधित व सुसाध्य अशा आजारांमुळे आलेले होते. म्हणुनच या प्रबंधामध्ये शिक्षण व योग्य रोजगारांच्या तरतूदींसोबतच योग्य व वेळेच्या वेळी वैद्यकीय सुविधांवर प्रकाश टाकण्यात आला.

६) जैस्वाल ए. एन.

यांनी अभ्यास केलेल्या **'शिक्षण घेवू शकणाऱ्या मतिमंद मुलांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास'** या अध्ययनात त्यांनी असे निष्कर्ष मांडले की, एकाच वयोगटातील सर्वसामान्य व मतिमंद मुलांवर होणारा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कौटूंबिक कलहाचा परिणाम हा सारखाच आहे. सात ते आठ वयोगटातील सर्वसामान्य आणि मतिमंद मुलांच्या व्यक्तिमत्वात होणारे बदल हे सारख्याच प्रकारचे आहेत. त्याचबरोबर त्यांच्या असे ही निदर्शनास आले की व्यक्तिमत्वाच्या विकासाच्या प्रवाहातील पहिल्या टप्प्यात सर्वसामान्य मुलांच्या तुलनेत मतिमंद मुले मागे राहतात.

७) संगिता किशनराव गायकवाड

'जालना जिल्ह्यातील अंध विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास' या अध्ययनात असे निष्कर्ष मांडले की, अंध विद्यार्थ्यांना आपण सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा कमी आहोत अशी जाणीव होते. अंध विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम या सर्व विषयाबाबत एकसारखेपणा आहे. अंध विद्यार्थ्यांना शाळेत ब्रेल लिपीतून पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जातात. अंध विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या शाळांची संख्या फारच थोडी आहे. शाळेत व्यवसायिक व तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. विद्यार्थ्यांना शाळेत अनेक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते. शाळेत नियमित आरोग्य तपासणी करण्याची सुविधा नाही.

८) दादाराव रामजी चव्हाण

'मराठवाड्यातील अस्थिव्यंग निवासी शाळेतून शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास' या अध्ययनात संशोधकाने अस्थिव्यंग निवासी शाळेतून शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या समस्यांचा अभ्यास केला आहे. त्यात त्यांना असे निष्कर्ष आढळून आले की, वह्या पाठ्यपुस्तके व इतर लागणारे साहित्य मुलांना वर्षातून दोन वेळा मिळते. अस्थिव्यंग मुले जिथे शिक्षण घेतात त्या इमारतीमध्ये अडथळा विरहित रॅम्पची सुविधा नाही. त्याचप्रमाणे भौतिकोपचाराची कुबडी ही साधने कमी प्रमाणात पुरविली जातात. शाळेमार्फत तज्ञ डॉक्टराकडून वैद्यकीय तपासणी वर्षातून एक वेळा केली जाते. शिक्षक, मुख्याध्यापक व काळजीवाहक यांच्याकडून अस्थिंव्यग मुलांना काही मदत लागल्यास योग्य ती मदत केली जाते. पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याची टाकी व फाउंटन टाईप नळ सुविधा आहे. अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना शिकविला जाणारा अभ्यासक्रम सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच आहे. अस्थिव्यंग विद्यार्थ्यांची अभ्यासातील प्रगती समाधानकारक दिसून आली. अशा प्रकारचे निष्कर्ष त्यांना आपल्या अध्ययनात दिसून आले

९) शर्मा आय. पी.

या संशोधनात व्यक्तिमत्वाची लक्षणे, अभिरूची आणि उच्च सर्जनशील व कमी सर्जनशील शारीरिक अपंगत्व असलेल्या मुलांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेल्या **'उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभिरूची व्यक्तिमत्वाची लक्षणे आणि महत्वकांक्षाचा तुलनात्मक अभ्यास'** या अध्ययनात मुलींपेक्षा शारीरिक अपंग मुले अधिक सर्जनशील आढळले. अभिरूची शोधिकेमध्ये उच्च प्रतिभाशाली अपंग मुलांनी कला क्षेत्रात, विज्ञान, तांत्रिक कार्य सरासरी उच्च गुणांकाची संपादणूक केली. त्याचबरोबर कमी सर्जनशील असणाऱ्या गटाने हस्तकला या क्षेत्रात जास्त अभिरूची दाखविली उच्च सर्जनशील आणि कमी सर्जनशील मुलांच्या महत्वकांक्षामध्ये कसलाही महत्वाचा फरक दिसून आला नाही.

१०) आनंद माधवराव वाघ

यांनी **'मराठवाड्यातील शिक्षण घेणाऱ्या मतिमंद मुलांच्या समस्यांचा अभ्यास'** या त्यांनी केलेल्या अध्ययनात असे निष्कर्ष मांडले की, सामान्य मुलांच्या तुलनेत मतिमंद मुलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. तुलनेने मतिमंदांच्या समस्या अधिक आहे. त्याचबरोबर सर्वसाधारण पारंपारिक शाळेतील सुविधापेक्षा मतिमंदाच्या शाळेतील सुविधा अत्यंत कमी आहेत. मतिमंदांच्या पालकांना अनेक सामाजिक व कौटुंबिक समस्यांना तोंड द्यावे लागते. मतिमंदांच्या शाळेतील मुख्याध्यापकांना आणि शिक्षकांना दैनंदिन व्यवहारात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. मतिमंद विद्यार्थ्यांना शैक्षणिक व इतरही अनेक समस्या आहेत.

११) पूनम तंगरी

अपंग मुलांच्या कुटुंबातील सामाजिक व मानसशास्त्रीय घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे केला आहे. त्यांनी केलेल्या **'अपंग मुलांच्या कुटुंबातील सामाजिक व मानसशास्त्रीय घटकांचा अभ्यास'** या अध्ययनात असे निष्कर्ष मांडले की, मुलांच्या संगोपनाबाबतच्या दृष्टिकोनाबाबत फरक आढळला नाही. अपंगत्वांचे ज्ञान व अपंगत्वांबाबतची वृत्ती शारीरिक अपंगत्व असलेल्या मुलांच्या मातांची वृत्ती मानसिक अपंगत्व असलेल्या मुलांच्या मातांपेक्षा अधिक अनुकूल आढळली. अपंग मुलांच्या मातांची वृत्ती अपंग मुलींच्या मातांच्या तुलनेत अधिक अनुकूल आढळली. सामान्य मुलांच्या माता–पित्यांचे वैवाहिक सामंज्यस अपंग मुलांच्या माता–पित्यांपेक्षा अधिक चांगल्या प्रतिचे आढळले. मानसिक व्यंग असलेल्या मुलांच्या मातांचे कौटुंबिक जीवन अस्थिर आढळून आले. कुटुंबातील आंतरक्रिया आणि तणाव शारीरिक अपंग मुलांच्या

मातांच्या तुलनेत अधिक तणावपूर्वक आढळून आले. सामान्य मुले अपंग मुलांपेक्षा समाजात अधिक मिसळणारे अधिक भावनिक व उत्साही, चंचल आढळून आले. शारीरिक अपंग मुलेही मानसिक अपंग मुलांच्या तुलनेत समाजात अधिक मिसळणारी आणि चंचल परंतु तुलनेने कमी भावनिक आढळून आली. परंतु उत्साहाच्या बाबतीत फारसा फरक आढळून आला नाही. दोन्ही अपंगत्वांच्या बाबतीत अपंग मुलींपेक्षा अपंग मुले अधिक उत्साही समाजात अधिक मिसळणारी व अधिक चंचल आढळून आली.

१२) पै किशोरी व पै महेश (१९९६)

यांनी लिहिलेल्या **मतिमंद व अपंग मुले** या पुस्तकात त्यांनी मतिमंद मुलांच्या समस्येच्या पैलूंचा अभ्यास केला आहे. तसेच त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सुचना केल्या आहेत. त्यांनी या पुस्तकात महाराष्ट्रातील मतिमंदांचा शैक्षणिक विकास अधोरेखित केला आहे. मतिमंदाच्या शिक्षणामध्ये महाराष्ट्र राज्य कसे आघाडीवर आहे हे अभिलेखित केले आहे. महाराष्ट्रात मतिमंदाची शाळा कोठे आहे. मतिमंदासाठी काम करणाऱ्या विविध संस्था या विषयी सविस्तर विवेचन त्यांनी आपल्या पुस्तकात केले आहे.

१३) नागरिक समाज की आवाज (२००८)

सामाजिक बहिष्करण से सामाजिक समावेश की और एक विकलांगता आंदोलन या शासनाच्या मासिकामध्ये दिव्यांग व्यक्तींची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. सामाजिक बहिष्काराशी संबंधित दिव्यांग विद्यार्थ्यांशी जोडलेल्या मुद्यांवर हा अहवाल प्रकाश टाकतो. दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे त्यांचे शिक्षण आणि रोजगार हे तीन मुद्दे विशेष महत्वाचे आहे. या अहवालात दिव्यांग व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार, समानतेचा आधिकार या सारख्या स्वत:च्या मूलभूत अधिकारांपर्यंत पोहोचू देत नाहीत हे या अहवालात सांगितले आहे.

१४) आलेगांवकर प.अ. (२०१०)

शारीरिक शिक्षण या पुस्तकात त्यांनी शिक्षणातून सर्वांचाच विकास अपेक्षित असतो. परंतु शिक्षण घेणारे सर्वच विद्यार्थी सारख्या बुध्दिमत्तेचे नसतात. प्रत्येकाची शारीरिक व बौध्दिक क्षमता वेगवेगळी असल्याचे त्यांच्या अध्यापनात दिसून आले आहे. मतिमंद विद्यार्थ्यांना शिकविणे, त्यांची परीक्षा घेणे, त्यांच्या मध्ये ज्ञानाचे चैतन्य निर्माण करणे. अवघड असल्याचे त्यांनी आपल्या पुस्तकात सांगितले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा शिक्षकाचा दृष्टिकोण त्यांनी आपल्या पुस्तकात स्पष्ट केला आहे.

१५) जोशी, कदम, जाधव. (२०११)

विशेष शिक्षण या पुस्तकात लेखकांनी दिव्यांग मुलांना शिक्षणात येणाऱ्या अडचणी कोणत्या आहेत. याचे विस्तृत विवेचन केले आहे. त्याचबरोबर दिव्यांग विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीवर उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांनुरूप प्रत्येकाचे प्रश्न वेगवेगळे आहे. मुलांतील अस्थिरतेमुळे निर्माण होणारी अडचण, त्याचबरोबर शिकविण्याच्या पध्दती व तंत्रे वापरण्यात अडचण शालेय जीवनात खेळात सहभाग घेण्याबाबत अडथळे इत्यादीचे विस्तृत विवेचन त्यांनी आपल्या पुस्तकात केले आहे.

अध्ययन विषयाचे वेगळेपण

भारतीय समाजामध्ये दिव्यांगांच्या समस्येवर विविध पैलूंच्या दृष्टिने विविध संशोधकांनी संशोधन कार्य केले असले तरी शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीवर संशोधनात्मक दृष्टिने प्रकाश टाकण्यात आलेला नाही. त्यांची आर्थिक स्थिती व त्यांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी याबाबीवर प्रकाश टाकण्यात आलेला नाही. म्हणून संशोधक आपली संशोधनात्मक बैठक निश्चित करण्यास्तव उपरोक्त उल्लेखित विविध संशोधनाचा आधार घेवून शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, स्थितीचे अध्ययन करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधन आराखडा प्रकरण योजना

१) **प्रस्तावना :** संशोधनाच्या प्रस्तावना या पहिल्या प्रकरणामध्ये दिव्यांगाच्या शिक्षणाचा इतिहास, दिव्यांगाच्या शिक्षणाची वाटचाल, दिव्यांगाचे शैक्षणिक धोरण, महाराष्ट्राचे दिव्यांग कल्याण धोरण २०१९, दिव्यांगाची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थिती इत्यादी बाबींचा समावेश पहिल्या प्रकरणात करण्यात येणार आहे.

२) **संशोधन साहित्याचा आढावा :** संशोधन साहित्याचा आढावा या दुसऱ्या प्रकरणामध्ये संबंधीत संशोधनाशी निगडित पूर्व संशोधनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

३) **संशोधन कार्यपध्दती :** संशोधन कार्यपध्दती या संशोधनाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधनाचे उद्देश, गृहितके, संशोधन आराखडा, नमुना निवड पध्दती, तथ्य संकलन पध्दती व तथ्यांचे विश्लेषण इत्यादी बाबींचा समावेश तिसऱ्या प्रकरणात करण्यात येणार आहे.

४) **शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण :** या संशोधनाच्या चौथ्या प्रकरणामध्ये मुलाखत अनुसूची द्वारे संकलीत केलेल्या शारीरिक दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक स्थितीच्या तथ्यांचे विश्लेषण एस.पी. एस.एस या सांख्यिकीय तंत्राचा वापर करून माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

५) **अध्ययनातील निष्कर्ष व शिफारशी :** संशोधनाच्या पाचव्या प्रकरणामध्ये संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून संकलीत माहितीच्या आधारे निष्कर्ष काढले जातील व तथ्यांच्या अनुषंगाने काही शिफारसी मांडल्या जातील.

संदर्भ

१) बोधनकर, सुधीर. अलोणी, विवेक. कुलकर्णी, मृणाल. २००७. सामाजिक संशोधन पध्दती. नागपुर: श्री साईनाथ प्रकाशन.

२) पै, किशोरी सुरेंद्र व पै, महेश सुरेंद्र. १९९६. मतिमंद व अपंग मुले. पुणे : सुयोग प्रकाशन.

३) नागरिक समाज की आवाज. मार्च और जून २००८. सामाजिक बहिष्करण से सामाजिक समावेश की और एक विकलांगता आंदोलन. नई दिल्ली: वॉलेंटरी ॲक्शन नेटवर्क इंडिया (वाणी).

४) आलेगांवकर, प. अ. २०१०. शारीरिक शिक्षण. पुणे: दिलीपराज प्रकाशन.

५) बच्चेवार, दिपक. मोरे. घायाळ. शारीरिक शिक्षणाचा इतिहास आणि पाया. नांदेड: संकेत प्रकाशन.

६) योजना मासिक. एप्रिल २०१३. अंक—९. अंपगांचे पुनर्वसन: शासकीय सवलती व योजना. नवी मुबंई: माहिती व जनसंपर्क महासंचनालय.

७) जोशी. कदम. जाधव. जानेवारी २०११. विशेष शिक्षण. नागपुर: विद्या प्रकाशन.

संशोधक **मार्गदर्शक**

कोमल सुभाष खरात डॉ. सुनंदा व्ही. भद्रशेटे